**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): VISHAL VILAS PATIL(I (Inspector)) / 12401000362VVPM8301P **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Patil

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस स्टेशन ऑफिसर

**Signature of Officer in charge, Police Station** शिराळा (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): VISHAL VILAS PATIL

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): 12401000362VVPM8301P

तपासिक I.O.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District** (जिल्हा): सांगली **P.S.**(ठाणे): शिराळा **Year** (वर्ष): 2020

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0208 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 01/06/2020 23:37 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): सोमवार **Date From** (दिनांक पासून): 01/06/2020

**Time Period** (कालावधी): पहर 5 **Date To** ( दिनांक पर्यंत): 01/06/2020

**Time From** (वेळेपासून): 13:53 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 13:53 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 01/06/2020 **Time** (वेळ): 23:37 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 025 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 01/06/2020 23:37 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): दक्षिण, 10 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): तलाठी कार्यालय नाटोली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री.ओंकार जयसिंग पाटील

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1992 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | हणमंत वाडा नाटोली,ताशिराळा जिसांगली,शिराळा ,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | हणमंत वाडा नाटोली,ताशिराळा जिसांगली,शिराळा ,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | भगवानसिंग व्यंकटसिंग राजपूत | | | 1. पंचायत समिती कलणी शिराळा,शिराळा, शिराळा ,सांगली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

वर्दी जबाब ता.01/06/2020मी ओंकार जयसिंग पाटील वय 28 वर्ष व्यवसाय शेती रा.दत्त मंदीर शेजारी हणमंत वाडा नाटोली ता.शिराळा जि.सांगली. मोबाईल नं. 9527918255.मी वरील ठिकाणी राहणार असुन माझे वडीलांचे नावे नाटोली ता. शिराळा जि. सांगली या ठिकाणी असले शेत जमीनीचा सव्र्हे नंबर व सातबारा चुक दुरुस्ती करून सातबारा उतारा देण्या करीता राजपूत तलाठी नाटोली यांनी 5,000/- रूपचे लाचेची मागणी केली असल्याने मी दि.30.05.2020 रोजी श्री. मोरे, पोलीस निरीक्षक, अन्टी करप्शन ब्युरो, सांगली यांचे मोबाईल फोनवर फोन करुन तलाठी कार्यालय नाटोली येथिल राजपूत तलाठी यांचे विरुध्द लाच मागणीची तक्रार असलेबाबत कळवीले. त्यावेळी श्री.मोरे साहेब यांनी मला दि.01.06.2020 रोजी सकाळी 10.00 वाजता शिराळा या ठिकाणी येत असल्याचे तसेच सदर बाबत गोपनीयता राखण्याच्या सुचना दिल्या.त्याप्रमाणे दि.01.06.2020 रोजी सकाळी 10.45 वा. चे सुमारास मोरे साहेबांनी माझे मोबाईलवर फोन करुन तवेरा गाडीचे वर्णन सांगून मला शिराळा येथील गोरक्षणाथ मंदीरा जवळ येणेबाबत कळविले. त्याप्रमाणे मी, माझे कडील मोटर सायकल वरुन शिराळा येथील गोरक्षणाथ मंदीरा जवळ जावून मोरे साहेबांना भेटून त्यांचेकडील तवेरा गाडीमध्ये बसलो. त्यावेळी मला मोरे साहेबांनी माझे तक्रारी बाबत विचारले असता मी त्यांना तलाठी कार्यालय नाटोली येथिल राजपूत तलाठी यांनी माझे वडीलांचे नावे नाटोली ता. शिराळा जि. सांगली या ठिकाणी शेत जमीनच्या सव्र्हे नंबर व सातबारा चुक दुरुस्ती करून सातबारा उतारा देण्या करीता राजपूत तलाठी यांनी 5000/- रूपचे लाचेची मागणी केली असलेबाबत सांगीतले त्यावेळी मोरे साहेबांचे सांगणेवरुन मी माझा तक्रारी अर्ज व संबधीत कागदपत्राच्या झेरक्स प्रती त्यांचे समक्ष हजर केल्या. मी दिलेला अर्ज मोरे साहेबांनी वाचून पाहिला. त्यानंतर मोरे साहेब यांनी तलाठी कार्यालय नाटोली ता. शिराळा येथील राजपूत तलाठी यांचेविरुध्द लाचलुचपतीचा सापळा लावण्याचे निश्चीत केले. त्यावेळी मोरे साहेबांनी माझी व पंच साक्षीदार यांची एकमेकात ओळख करुन दिली. तसेच सापळा पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर मला माझी लाचलुचपतीची तक्रार दोन्ही पंचाना तोंडी सांगण्यास सांगीतली असता, मी माझी तक्रार दोन्ही पंचाना सांगीतली. त्यानंतर मोरे साहेबांनी माझा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचणेस दिला. दोन्ही पंचानी तक्रारी अर्ज वाचून मी तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जा मधील मजकूर एकच असल्याचे सांगुन तक्रार वाचलेबाबत तक्रारी अर्जावर दोन्ही पंचानी व मोरे साहेबांनी सहया केल्या. त्यानंतर मोरे साहेब यांनी मला व दोन्ही पंचाना व्हाईस रेकर्ड व मेमरी कार्ड बाबत माहिती देवून पडताळणी कामी मला व पंच नं.1 श्री.भालेकर यांना आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर मोरे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकर्डर सुरु करुन माझेकडे दिला. मी तो माझे अंगावरील पन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशामध्ये ठेवला. त्यानंतर मला व पंच नं. 1 श्री. भालेकर यांना लोकसेवक राजपूत तलाठी यांची भेट घेण्यास जाणेकरीता रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे मी व पंच नं. 1 श्री. भालेकर असे माझेकडील हिरो स्प्लेंडर कंपनीची मोटर सायकल क्र. एम.एच.10 बी.ई.9774 वरून रवाना होवून तहसिलदार कार्यालय, शिराळा येथे गेलो. तेथे माझी मोटर सायकल पार्क करुन मी व पंच नं.1 असे तहसिल कार्यालयात राजपूत तलाठी यांचे बसण्याचे खोलीत गेलो. त्याठिकाणी

राजपूत तलाठी दिसून आले नाहीत. त्यामुळे आजू बाजूस त्यांचा शोध घेतला परंतू ते दिसून आले नाहीत. त्यामुळे मी व पंच नं.1 असे तहसील कार्यालयाचे बाहेर आलो. मी माझे मोबाईल वरुन राजपूत तलाठी यांचे मोबाईलवर फोन लावला असता त्यांनी माझा फोन रिसीव्ह केला नाही. त्यावेळी मी व पंच नं.1 असे मी लावलेल्या माझे मोटर सायकल जवळ येवून निघण्याचे तयारीत असताना राजपूत तलाठी यांचा माझे मोबाईलवर फोन येत असलेचे दिसलेने मी त्यांचा मोबाईल रिसीव्ह करुन माझे मोबाईलचा स्पिकर ऑन करुन मी त्यांना तहसील कार्यालयात आलो असलेचे सांगीतले. त्यावेळी राजपूत तलाठी यांनी मी नाटोली येथे असलेचे सांगून नाटोली येथे येण्यास सांगीतले. त्यानंतर मी व पंच नं.1 असे मोरे साहेब थांबले त्या ठिकाणी आलो. त्यावेळी मोरे साहेब यांनी माझेकडील व्हाईस रेकर्डर घेवून तो बंद करुन त्यांचे ताब्यात घेतला. त्यानंतर मोरे साहेब यांनी पंच नं.1 श्री. भालेकर यांना घडलेली हकीकत विचारली. त्यांनी घडलेली हकीकत सांगीतली. त्यानंतर मोरे साहेब यांनी मला हकीकत विचारली असता मी ही त्यांना घडलेली हकीकत सांगीतली.त्यानंतर मोरे साहेबांनी मला व पंच नं.1 श्री.भालेकर यांना तलाठी कार्यालय, नाटोली या ठिकाणी जाणेचे ठरवून मला मोरे साहेबांनी माझे मोटर सायकल वरुन नाटोली गांवचे अलीकडे जावून थांबणेस सांगीतले. त्याप्रमाणे मी माझे मोटर सायकलवरुन रवाना झालो. माझे पाठोपाठ मोरे साहेब, पंच व सापळा पथक असे खाजगी तवेरा गाडीमधून निघाले. नाटोली गांवचे थोडे अलीकडे मी माझी मोटर सायकल थांबवीली. माझे पाठोपाठ मोरे साहेबांनी त्यांचेकडील तवेरा गाडी थांबवली. व मला तवेरा गाडीमध्ये बसणेस सांगीतले. त्याप्रमाणे मी तवेरा गाडीमध्ये बसलो.त्यानंतर मोरे साहेब यांनी मला व दोन्ही पंचाना व्हाईस रेकर्ड व मेमरी कार्ड बाबत पुन्हा माहिती देवून पडताळणी कामी मला व पंच नं.1 श्री.भालेकर यांना सुचनाची उजळणी करुन दिली. त्यानंतर मोरे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकर्डर सुरु करुन माझेकडे दिला. मी तो माझे◌े अंगावरील पन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशामध्ये ठेवला. त्यानंतर मला व पंच नं. 1 श्री. भालेकर यांना लोकसेवक राजपूत तलाठी यांची भेट घेण्यास जाणेकरीता रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे मी व पंच नं. 1 श्री. भालेकर असे माझेकडील मोटर सायकल वरून रवाना होवून ग्रामपंचायत कार्यालय नाटोली येथे गेलो. कार्यालयाचे बाहेर मोटर सायकल पार्क करुन मी व पंच नं.1 असे मोटर सायकलवरुन उतरुन पायी चालत राजपूत तलाठी बसतात त्या खोलीमध्ये गेलो. त्यावेळी राजपूत तलाठी हे त्यांचे खोलीमध्ये खुर्चीवर बसले होते.मी त्यांचेशी माझे कामाबाबत चर्चा केली. सदर चर्चेमध्ये लोकसेवक राजपूत यांनी मला खाते उतारा व 7/12 उतारा देतो असे सांगीतले. व राजपूत तलाठी यांनी त्यांचे मोबाईलवर 5000 असा आकडा टाईप करुन बरोबर होत सगळ असे म्हणून तुमच्या वडीलांनी काम करा येवढ देतो असे सांगीतले होते. असे म्हणाले. त्यावर मी त्यांना जास्त वाटतय असे म्हणून कायतर कमी करा असे म्हणालो. त्यावर राजपूत तलाठी यांनी जेवण पाहीजे तुझ्याकडून आपल्याला असे म्हणाले. त्यावर मी राजपूत तलाठी यांना आज सगळं क्लेर करुन टाकतो असे म्हणालो. त्यावर राजपूत तलाठी यांनी मला फक्त ई पेपरला जावून बघतो, असे म्हणून त्यांनी माझे कामाबाबत चर्चा केली. त्यावर मी किती दयायचे राहतय तुम्हाला असे विचारले असता त्यावर राजपूत तलाठी यांनी मला सगळच राहीलय कुठकाय दिलय मला असे म्हणून आता किती देणार असे विचारले, तेव्हा मी मला सांगा आकडा काय असेल ते असे विचारले, तेव्हा त्यांनी पुन्हा माझे कामाबाबत चर्चा करुन माझ्या हातात जेवढ आहे तेवढ केलयं, माझ्याकडे फुडच काय नाय, थम दयायच साहेबांच काम आहे. परत सर्कलकडे जाणार, सर्कल व्हेरीफाय करणार असे सांगीतले. त्यावर मी तलाठी राजपूत यांना मला सागांवला जावून एटीएम ला जावून यायचे आहे असे सांगीतले. त्यावर राजपूत तलाठी यांनी मेल ला पाठवू काय असे सांगीतले. त्यावर मी त्यांना मेल लाच पाठवा मी झेरक्स काढले आहे असे सांगीतले. त्यावर राजपूत तलाठी यांनी तुम्ही मला काल फोन करायला पाहीजे होता. मी रजिस्टर घेवून आलो असतो असे सांगीतले. त्यावर मी त्यांना काल तुम्ही फोन केला असताना आठवण केली असती तर मी सकाळी घेवूनच आलो असतो असे सांगीतले. त्यावर राजपूत तलाठी यांनी मला सगळच दयायच त्यात कमीपण काय करु नका, जेवायच काय? असे म्हणाले. त्यावर मी राजपूत तलाठी यांना मी देतो जेवण जेवायचे काय विषय सोडा. त्यावेळी राजपूत तलाठी यांनी मला मोबाईलवर 4000 असा आकडा टाईप केला. त्यावर मी राजपूत तलाठी यांना टप्पा टप्पाने देवू का असे विचारले. त्यावर राजपूत तलाठी यांनी मला तुमच्या मनावर माझे काय असे म्हणाले. त्यावर मी राजपूत तलाठी यांना दोन आता देतो दोन नंतर देतो चालतय का असे विचारले. त्यावर राजपूत तलाठी यांनी चालतय असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच नं.1 भालेकर असे तेथून निघून मोरे साहेब थांबले त्या ठिकाणी आलो. त्यावेळी मोरे साहेब यांनी माझेकडील व्हाईस रेकर्डर घेवून तो बंद करुन त्यांचे ताब्यात घेतला. त्यानंतर मोरे साहेब यांनी पंच नं.1 श्री.भालेकर यांना घडलेली हकीकत विचारली. त्यांनी घडलेली हकीकत सांगीतली. त्यानंतर मोरे साहेब यांनी मला हकीकत विचारली असता मी ही त्यांना घडलेली हकीकत सांगीतली.त्यानंतर मोरे साहेबांनी मला लाच रक्कम 2,000/-रुपये हजर करणेस सांगीतली. त्यावेळी मी माझेकडील 2,000/-रुपये हजर केले. त्यामध्ये 500/-रुपये दराच्या 4 नोटा होत्या. त्यानंतर मोरे साहेबांच्या सुचनेवरून दोन्ही पंच◌ानी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर मोरे साहेब यांनी अथ्रासिन पावडर व अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे उपयोग व गुणधर्म सांगीतले. त्यानंतर सपोफौ. धुमाळ यांनी 2,000/-रुपये रकमेच्या नोटांना अथ्रासिन पावडर लावून ती लाच रक्कम राजपूत, तलाठी, नाटोली यांना देणेसाठी माझे अंगावरील शर्टचे समोरील डावे बाजूचे खिशात ठेवली. त्यानंतर मोरे साहेब यांनी नवीन पकबंद मेमरी कार्ड दोन्ही पंचाना दाखवून त्याबाबत माहीती दिली. त्यानंतर मोरे साहेबांनी मला, पंच नं.1 व पंच नं.2 तसेच सापळा पथकास सापळयाचे कामी आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर मोरे साहेब यांनी त्यांचे कडील व्हाईस रेकर्डर सुरु करुन माझेकडे दिला. तो व्हाईस रेकडर मी माझे पन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवला. मला व पंच नं.1 श्री. भालेकर यांना रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे मी व पंच नं. 1 श्री.भालेकर असे माझेकडील मोटरसायकल वरुन रवाना झालो. आमचे पाठोपाठ मोरे साहेब व सापळा पथक खाजगी तवेरा गाडीतून निघाले. मी व पंच नं.1 असे माझेकडील मोटर सायकलवरुन निघून ग्रामपंचायत कार्यालय, नाटोली चे आवारात जावून माझी मोटर सायकल पार्किंग जागेत पार्क करुन मी व पंच नं.1 श्री. भालेकर असे पायी चालत तलाठी कार्यालयामध्ये गेलो. त्यावेळी राजपूत तलाठी हे त्यांचे खोलीमध्ये हजर होते. तलाठी राजपूत यांनी माझेकडे पाहून आणलाय का प्रिन्टा असे विचारले. त्यावेळी मी त्यांना मला वाटल प्रिन्टा काढल्यात तुम्ही, मी एटीएम ला गेलो होतो, असे सांगीतले. त्यावर राजपूत तलाठी यांनी मला मी काय म्हटलं तुला, मला सागांवला जायच आहे लवकर ये असे म्हणाले, त्यावर मी त्यांना मला एटीएम ला जायचे होते असे म्हणालो. त्यावर राजपूत तलाठी यांनी माझेकडे गाडी नाही. मला वाटलं तुझ्या सोबत गेलो असतो सागांवला, पण तु कुठे गेला होतास चिखलीला असे म्हणाले. त्यावर मी राजपूत तलाठी यांना तुम्हाला गाडीवरुन सोडतो, सागांवला असे म्हणालो. त्यानंतर राजपूत तलाठी यांनी मला माझे कामा संदर्भातील कागदपत्रे माझेकडे दिली. सदरची कागदपत्रे मी माझे डावे हाताने स्विकारुन सदर कागदपत्राची सुरळी करुन माझे पन्टचे समोरील डावे बाजूचे खिशामध्ये ठेवली. त्यानंतर राजपूत तलाठी यांनी पैशे देण्याबाबत मला हाताने इशारा करुन लाच मागणी केली असता मी माझे शर्टचे समोरील डावे बाजूचे खिशातून 2,000/-रुपये लाचेची रक्कम उजवे हाताने बाहेर काढून राजपूत तलाठी यांचे समोर धरली असता त्यांनी ती लाचेची रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारुन त्यांचे शर्टचे डावे बाजूचे खिशात ठेवली. त्यानंतर मी लागलीच ग्रामपंचायत कार्यायाचे बाहेर येवून माझा डावा हात डोकीवरुन दोन वेळा फिरवून लाच स्विकारलेचा पूर्वनियोजीत इशारा केला. पंच नं.1 हे तलाठी कार्यालयाचे बाहेरच थांबले हो◌ेते. लागलीच मोरे साहेब